Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in
Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/१२ वी/परीक्षा/3585
दिनांक : 26 NOV 2024

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ विद्यार्थ्यांची अतिविलंब/ विशेष अतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत.....**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मंडळ विनियम १९७७ नियम क्र.९३ अन्वये फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दि.२२/११/२०२४ रोजी संपुष्टात येत आहे.

आवेदनपत्रे सादर करण्याची निर्धारीत मुदत संपल्यानंतर (१)श्रेणी/तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा सुरु होण्यापूर्वी ३० दिवसाचा कालावधी वगळून त्याअगोदर प्रतिदिनी रु.५०/- याप्रमाणे अतिविलंब शुल्क, (२) अतिविलंब शुल्काच्या निर्धारित तारखेनंतर लेखी किंवा प्रात्यक्षिक परीक्षेच्या अगोदर जी परीक्षा सुरु होणार आहे, त्यातील सुरुवातीच्या १५ दिवसापर्यंत प्रती विद्यार्थी प्रति दिन रु.१००/- विशेष अतिविलंब शुल्क व तद्नंतरच्या १५ दिवसांकरिता व परीक्षेच्या अगोदरच्या दिवसापर्यंत म्हणजेच दि.१०/०२/२०२५ पर्यंत रु.२००/- प्रमाणे अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

लेखी परीक्षा दि.११/०२/२०२५ रोजी सुरु झाल्यानंतर कोणत्याही नियमित, पुनर्परिक्षार्थी, श्रेणीसुधार, खाजगी विद्यार्थी, तुरळक व आय.टी.आय. विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे स्विकारली जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

| परीक्षा | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.५०/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.१००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | अतिविशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.२००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) |
|---|---|---|---|
| **उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा** | शनिवार दि.२३/११/२०२४ ते मंगळवार दि.२४/१२/२०२४ | बुधवार दि.२५/१२/२०२४ ते बुधवार दि.०८/०१/२०२५ | गुरुवार दि.०९/०१/२०२५ ते सोमवार दि.१०/०२/२०२५ |

१. सदर आवेदनपत्र कनिष्ठ महाविद्यालयाने ऑनलाईन पद्धतीने **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. आवेदनपत्र Online भरलेल्या विद्यार्थ्यांचे अतिविलंब/ विशेष अतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्क Online चलन तयार करुन चलनावर नमुद ICICI बँकेच्या Virtual Account मध्ये कोणत्याही बँकेव्दारे RTGS/NEFT व्दारे त्वरीत जमा करण्यात यावे. रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामधील सर्व विद्यार्थ्यांच्या Application Status मध्ये Send to board व Payment status मध्ये Paid असा बदल झाला आहे का याची खातरजमा करावी. असे status प्राप्त झालेली आवेदनपत्रेच ग्राह्य धरण्यात येतील. विभागीय मंडळाने अशी आवेदनपत्रे व चलने स्विकारुन व त्याचे status ची खात्री करावी.
२. Application Status मध्ये Send to board व Payment status मध्ये Paid असे नमुद विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र, प्रिलिस्ट व चलन सोबतच्या नमुन्याप्रमाणे (परिशिष्ट अ) विहीत प्रपत्र पुनर्परिक्षार्थी, श्रेणीसुधार व तुरळक विद्यार्थ्यांच्या इ.१२ वी च्या मागील परीक्षांचे गुणपत्रकांच्या छायाप्रतिसह मंडळ कार्यालयात जमा करावेत.
३. मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्याचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होऊ शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही, असे विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेऊन सदर हमीपत्र परिशिष्ट अ सोबतच मंडळ कार्यालयात जमा करावे.
४. त्याचप्रमाणे आवेदनपत्रामध्ये नाव/ जन्मतारीख/ विषय/ माध्यम याबाबत Prelist च्या दुरुस्त्या राहिलेल्या असल्यास Online पध्दतीने ०५ डिसेंबर २०२४ पर्यंत पूर्ण करण्यात यावे.

**कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.**

**( सुभाष रा.चौगुले )**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

# परिशिष्ट-अ

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-४.

**परीक्षेचे नाव - फेब्रुवारी-मार्च २०२५**
**विभागीय मंडळाचे नाव - कोल्हापूर विभागीय मंडळ**
**प्रकरणिका क्रमांक -**

## विद्यार्थ्यांची मुदतबाह्य आवेदनपत्रे स्विकारण्याबाबत शिफारस
## इ.१२ वी

१) विद्यार्थ्यांचे नाव - ----------------------------------------------------------------

२) क.म.वि.नाव व पत्ता - ----------------------------------------------------------------

३) क.म.वि.सांकेतिक क्रमांक - ----------------------------------------------------------------

४) विद्यार्थ्यांना आवेदनपत्रे सादर करता आली नाहीत त्याबाबत खालील कारणासमोर खूण करावी.
अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार　　ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन
क ( ) नैसर्गिक आपत्ती　　ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास
इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/ परदेशी जाणे भाग पडल्यास

५) उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा
अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार　　ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन
क ( ) नैसर्गिक आपत्ती　　ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास
इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/ परदेशी जाणे भाग पडल्यास
(याबाबत नियमित विद्यार्थ्यांची हजेरी तपासून सदरचे कारण ग्राह्य धरावे.)

६) कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांची शिफारस -

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

**प्राचार्य स्वाक्षरी व शिक्का**

अ) अतिविलंबाचे एकूण दिवस : --------------------------------　　ब) अतिविलंबाच्या दंडाची रक्कम : --------------------------------

क) दंड कशाप्रकारे भरला : रोख/चलन क्रमांक ----------------------------------------------------------------

ड) विभागीय अध्यक्षांची शिफारस : ----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून, उमेदवाराने आवेदनपत्र उशीरा सादर करण्यासाठी दिलेले कारण योग्य आहे. केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणूनच मंडळ विनियम क्रमांक ९३ मधील तरतुदीनुसार उमेदवारांचा अर्ज स्वीकारावा अशी माझी शिफारस आहे. सदर विद्यार्थ्यांचे आवश्यक ते अतिविलंब शुल्क कार्यालयात जमा केले आहे.

**विभागीय अध्यक्षांची स्वाक्षरी**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

----------------------------------------------------------------

## हमीपत्र

हमीपत्र देतो/देते की, मी (विद्यार्थ्यांचे नाव) ........................................................................ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ परीक्षेचा फॉर्म अतिविलंब शुल्काने सादर करीत आहे. तरी, मला विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल व सदर परीक्षेचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होऊ शकला नाही तरी मी त्यास हरकत घेऊ शकणार नाही.

**स्वाक्षरी -**
**विद्यार्थ्याचे नाव -**